सकाळ



कोल्हापूर : 'डिपेक्स २०२३' स्पर्धेत राज्यस्तरावर द्वितीय क्रमांक पटकाविलेल्या शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागातील विजेत्यांचा सत्कार करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के.

# 'डिपेक्स २०२३' स्पर्धेत तंत्रज्ञान विभाग द्वितीय

कोल्हापूर, ता. १८ : अखिल भारतीय विद्यार्थी परिषद व पुणे येथील सृजन ट्रस्टतर्फे डिपेक्स-२०२३ स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागाने इंडस्ट्रियल अटोमेशन विभागात 'अटोमॅटिक कॉन्टॅक्टलेस भेळ व्हेंडिंग मशीन' प्रकल्पाकरिता राज्यस्तरावर द्वितीय क्रमांक मिळवला. विजेत्यांना प्रमाणपत्र, स्मृतिचिन्ह व रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते अंतिम वर्ष मेकॅनिकल इंजिनियरिंगचे विद्यार्थी सौरव बेन्नूरकर, सर्वेश्वर देसाई, विशाल पाटील, आशिष माने व प्रकल्प मार्गदर्शक प्रा. हर्षवर्धन पंडित यांचा सत्कार करण्यात आला.

अभियांत्रिकी, विज्ञान, कृषी क्षेत्रातील विद्यार्थ्यांनी संशोधनातून साकारलेल्या तंत्रविषयक आविष्काराला एक व्यासपीठ उपलब्ध होण्यासाठी अखिल भारतीय विद्यार्थी परिषद आणि सृजन संस्थेच्या वतीने सिपना अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयात ७ ते ९ एप्रिलदरम्यान डिपेक्स अंतर्गत प्रदर्शन व स्पर्धा झाली. प्रकल्पांची सर्जनशीलता, नावीन्यपूर्णता व समाजास उपयुक्तता तसेच तंत्रज्ञान हस्तांतरणाची सुलभता आदी निकषांवर मूल्यांकन करण्यात आले.

विद्यापीठाच्या प्रकल्पास प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांचे प्रोत्साहन, तर (कै.) नरेंद्र देशपांडे यांचे मार्गदर्शन मिळाले. विजेत्यांच्या सत्कारप्रसंगी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक प्रा. डॉ. एस. एन. सपली, मेकॅनिकल इंजिनियरिंगचे समन्वयक प्रा. डॉ. ए. बी. कोळेकर उपस्थित होते.

19 APR 2023

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सकाळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात मंगळवारी शिवस्पंदन क्रीडा महोत्सवाचा प्रारंभ झाला. राष्ट्रीय फुटबॉलपटू प्रतीक्षा मिठारी हिने आणलेल्या क्रीडाज्योतीने स्पर्धेची ज्योत प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी प्रज्वलित केली. या वेळी शरद बनसोडे, पी. टी. गायकवाड, श्रीकृष्ण महाजन आदी उपस्थित होते.

# शानदार संचलन, प्रात्यक्षिकांनी शिवस्पंदन क्रीडा महोत्सवास प्रारंभ

## शिवाजी विद्यापीठात विविध स्पर्धा; १९०० खेळाडूंचा सहभाग

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १८ : क्रीडापटूंचे उत्कृष्ट संचलन, विविध क्रीडाप्रकारांच्या प्रात्यक्षिकांचे सादरीकरण आणि ज्योत प्रज्वलन या उपक्रमांनी आज सकाळी शिवाजी विद्यापीठाच्या पहिल्या शिवस्पंदन क्रीडा महोत्सवाला शानदार प्रारंभ झाला. त्यात एकूण एक हजार ९०० खेळाडू सहभागी झाले आहेत.

प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी सकाळी आठ वाजता रोपट्यास पाणी वाहून शिवस्पंदन क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन तसेच ध्वजवंदन केले. त्यानंतर विद्यापीठाच्या विविध ११ अधिविभागांतील क्रीडापटूंनी उत्कृष्ट संचलन केले. यामध्ये ॲग्रोकेमिकल अँड पेस्ट मॅनेजमेंट, जैव-रसायनशास्त्र, वनस्पतीशास्त्र, रसायनशास्त्र, शिक्षणशास्त्र, गणित, इंग्रजी, सूक्ष्मजीवशास्त्र, समाजशास्त्र, तंत्रज्ञान अधिविभाग आणि नॅनो विज्ञान व तंत्रज्ञान या अधिविभागांतील खेळाडू विद्यार्थी सहभागी झाले. या वेळी विद्यापीठाची राष्ट्रीय फुटबॉलपटू प्रतीक्षा संजय मिठारी हिच्या हस्ते उद्घाटनस्थळी क्रीडा ज्योतीचे आगमन झाले. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते शिवस्पंदन स्पर्धेची ज्योत प्रज्वलित करण्यात आली. या वेळी क्रीडापटूंनी मुष्टीयुद्ध, मल्लखांब, जिम्नॅशियम तसेच रस्सीखेच या क्रीडा प्रकारांची प्रात्यक्षिके सादर केली. क्रिकेट स्पर्धा झाली. या वेळी प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांनी सहभागी संघांना शुभेच्छा दिल्या. आकाशात फुगे सोडून औपचारिक उद्घाटन झाल्याचे घोषित केले. प्रतीक्षा मिठारी हिने सहभागी खेळाडूंना शपथ दिली. क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. अविराज कुळदीप यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. पी. टी. गायकवाड यांनी आभार मानले. या वेळी अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, आजीवन अध्ययन केंद्राचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले, डॉ. प्रशांत पाटील, एन. आर. कांबळे, विजय रोकडे, चंद्रकांत गिरी, संजय तोरस्कर आदी उपस्थित होते. क्रीडा महोत्सवाच्या पहिल्या दिवशी झालेल्या स्पर्धेत सुमारे ८५० खेळाडू सहभागी झाले. उद्या (ता. १९) ॲथलेटिक्स, कबड्डी आणि क्रिकेट स्पर्धेची दुसरी फेरी होईल.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात शिवस्पंदन क्रीडा महोत्सवाच्या उद्घाटन सत्रात मलखांबाची प्रात्यक्षिके सादर करताना क्रीडापटू विद्यार्थिनी.

### खेळाडू, क्रीडाविकासाला बळ

■ विद्यापीठाच्या कॅम्पसवरील अधिविभागांमध्ये विविध क्रीडाप्रकारांतील अनेक खेळाडू आहेत. त्यांचे खेळातील कौशल्य वाढविण्यासह एकूणच क्रीडा विकासाला बळ देणे, गुणवत्तापूर्ण खेळाडू शोधून त्यांना अद्ययावत प्रशिक्षण देऊन राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी तयार करण्याच्या उद्देशाने विद्यापीठाने शिवस्पंदन क्रीडा महोत्सवाचे आयोजन केले असल्याचे डॉ. शरद बनसोडे यांनी सांगितले.

19 APR 2023

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात शिवस्पंदन क्रीडा महोत्सवास प्रारंभ





१) शिवाजी विद्यापीठाची राष्ट्रीय फुटबॉलपटू प्रतीक्षा मिठारी हिने आणलेल्या क्रीडाज्योतीने स्पर्धेची ज्योत प्रज्वलित करताना प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्यासह मान्यवर. २) मल्लखांबची प्रात्यक्षिके सादर करताना क्रीडापटू विद्यार्थी.

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

क्रीडापटूंचे उत्कृष्ट संचलन, विविध क्रीडा प्रकारांच्या प्रात्यक्षिकांचे सादरीकरण आणि ज्योत प्रज्वलन या उपक्रमांनी मंगळवार, १८ एप्रिल रोजी सकाळी शिवाजी विद्यापीठाच्या पहिल्या 'शिवस्पंदन क्रीडा महोत्सव २०२३'चे शानदार उद्घाटन करण्यात आले. विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी रोपट्यास पाणी घालून शिवस्पंदन क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन, तसेच ध्वजवंदन केले. त्यानंतर विद्यापीठाच्या विविध ११ अधिविभागांतील क्रीडापटूंनी उत्कृष्ट संचलन केले. यामध्ये ॲग्रोकेमिकल अँड पेस्ट मॅनेजमेंट, जैव-रसायनशास्त्र, वनस्पतीशास्त्र, रसायनशास्त्र, शिक्षणशास्त्र, गणित, इंग्रजी, सूक्ष्मजीवशास्त्र, समाजशास्त्र, तंत्रज्ञान अधिविभाग आणि नॅनो विज्ञान व तंत्रज्ञान या अधिविभागांनी सहभाग दर्शवला.

यावेळी विद्यापीठाची राष्ट्रीय फुटबॉलपटू प्रतीक्षा संजय मिठारी हिच्या हस्ते क्रीडाज्योतीचे आगमन झाले आणि त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते शिवस्पंदन स्पर्धेची ज्योत प्रज्वलित करण्यात आली. यावेळी क्रीडापटूंनी मुष्टीयुद्ध, मल्लखांब, जिम्नॅशियम, रस्सीखेच या क्रीडा प्रकारांची प्रात्यक्षिके सादर केली. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांनी सहभागी संघांना शुभेच्छा दिल्या. प्रतीक्षा मिठारी हिने सहभागी खेळाडूंना शपथ दिली. क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. अविराज कुळदीप यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. प्रकाश गायकवाड यांनी आभार मानले. यावेळी अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, आजीवन अध्ययन केंद्राचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले, डॉ. प्रशांत पाटील, डॉ. कांबळे, डॉ. रोकडे, डॉ. गिरी, संजय तोरस्कर आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
19 APR 2023 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवस्पंदन क्रीडा महोत्सवास प्रारंभ

## शिवाजी विद्यापीठातील ३७ अधिविभागातील १९०० खेळाडूंचा सहभाग

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील ३७ अधिविभागांमधील तब्बल १९०० खेळाडूंचा सहभाग असलेल्या पहिल्या 'शिवस्पंदन क्रीडा महोत्सव-२०२३' ला मंगळवारी सुरुवात करण्यात आली. २१ एप्रिलपर्यंत ६ खेळांच्या स्पर्धा या महोत्सवात रंगणार आहेत. रणरणत्या उन्हातही सळसळता उत्साह कायम ठेवत शेकडो खेळाडूंनी महोत्सवाच्या उद्घाटनानंतर विविध खेळांच्या स्पर्धांमधील सामन्यांना सुरुवात केली.

चालू शैक्षणिक वर्षात विद्यापीठातील विविध अधिविभागांमध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांमधील खेळाडूला मैदान गाजवण्याची संधी देण्याच्या भावनेने विद्यापीठाने पहिल्या शिवस्पंदन क्रीडा महोत्सवाचे आयोजन केले आहे. सकाळी विद्यापीठातील क्रीडामहर्षी मेघनाथ नागेशकर क्रीडा संकुलात प्र. कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते रोपट्यास पाणी घालून क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले. त्यांच्याच हस्ते संकुलात ध्वजवंदनही केले. यानंतर विद्यापीठाची राष्ट्रीय फुटबॉलपटू प्रतीक्षासंजय मिठारी हिच्या हस्ते क्रीडा संकुलात क्रीडाज्योतीचे आगमन केले. या क्रीडाज्योतीचे



कोल्हापूर : शिवस्पंदन क्रीडा महोत्सवाच्या उद्घाटनावेळी क्रीडाज्योतीचे प्रज्वलन करताना प्र. कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील. सोबत डॉ. शरद बनसोडे, प्रतीक्षा मिठारी, डॉ. प्रकाश गायकवाड आदी.

मान्यवरांच्या हस्ते प्रज्वलन केले. यानंतर ॲग्रोकेमिकल अँड पेस्ट मॅनेजमेंट, जैव-रसायनशास्त्र, वनस्पतीशास्त्र, रसायनशास्त्र, शिक्षणशास्त्र, गणित, इंग्रजी, सूक्ष्मजीवशास्त्र, समाजशास्त्र, तंत्रज्ञान अधिविभाग आणि नॅनो विज्ञान व तंत्रज्ञानसह ३७ अधिविभागांमधील खेळाडूंनी संचलन केले. संचलनच्या सांगतेनंतर खेळाडूंनी मुष्टीयुद्ध, मल्लखांब, जिम्नॅशियम, रस्सीखेच या खेळाची प्रात्यक्षिके सादर केली. प्रतीक्षा मिठारीने महोत्सवातील सहभागी खेळाडूंना शपथ दिली.

यानंतर विद्यापीठातील विविध क्रीडांगणावर क्रिकेट, बुद्धिबळ व मैदानी खेळांच्या स्पर्धांना सुरुवात करण्यात आली. यावेळी अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, आजीवन अध्ययन केंद्राचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले, डॉ. प्रशांत पाटील, डॉ. एन. आर. कांबळे, डॉ. विजय रोकडे, डॉ. चंद्रकांत गिरी व जिम्नॅस्टीक कोच संजय तोरस्कर आदी उपस्थित होते. क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाचे संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. अविराज कुळदीप यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. प्रकाश गायकवाड यांनी आभार मानले.

**रन फॉर फिटनेससाठी**
**२१ एप्रिला मॅरेथॉन**

'शिवस्पंदन क्रीडा महोत्सवाची २१ एप्रिलला सांगता होणार आहे. यानिमित्त विद्यापीठात ७ किलोमीटरच्या मॅरेथॉनचे आयोजन केले जाणार आहे. तरी विद्यापीठातील सर्व आधिविभागांमधील विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचाऱ्यांसह सर्वच घटकांनी सहभागी व्हावे. या मॅरेथॉनमधील यशस्वी धावपटूंना चषक, पदके व प्रमाणपत्र असे बक्षीस देऊन गौरवले जाणार आहे, असे डॉ. शरद बनसोडे यांनी सांगितले.




कोल्हापूर : क्रीडा महोत्सवात विद्यार्थ्यांनी मल्लखांबाची चित्तथरारक प्रात्यक्षिके सादर करुन उपस्थितांची मने जिंकली

सकाळ

# नॅनोसायन्स विभागातील तीन विद्यार्थिनींना 'समर रिसर्च फेलोशिप'



आकांक्षा माने



गायत्री माने



उजमा फरास

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी या अधिविभागातील तीन विद्यार्थिनींची इंडियन अकॅडमी ऑफ सायन्सेस, बेंगलोर यांच्यातर्फे दिल्या जाणाऱ्या प्रतिष्ठित समर रिसर्च फेलोशिपसाठी निवड झाली आहे. या फेलोशिप अंतर्गत निवड झालेल्या विद्यार्थ्यांना भारतातील आघाडीच्या शिक्षण आणि संशोधन संस्थांमध्ये दोन महिने संशोधन करण्यासाठी बोलावले जाते. या कालावधीमध्ये विद्यार्थ्यांना फेलोशिप मिळते. निवड झालेल्या विद्यार्थिनी बी. एस्सी., एम.एस्सी., नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी (पाच वर्षांचा एकात्मिक) अभ्यासक्रमाचे शिक्षण घेत आहेत. त्यातील आकांक्षा कृष्णात माने (चोपडेवाडी, सांगली) हिची इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स बेंगलोर येथे निवड झाली आहे. गायत्री सुधाकर पाटील (भादोले, कोल्हापूर) आणि उजमा अंजुम फरास (कोल्हापूर ) यांची इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी मंडी, हिमाचल प्रदेश येथे निवड झाली आहे. त्यांना अधिविभागातील डॉ. सुशीलकुमार जाधव, योजना पाटील, मुकेश पाडवी यांचे मार्गदर्शन लाभले. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, अधिविभागाचे प्रभारी संचालक प्रा. डॉ. किरणकुमार शर्मा अभिनंदन केले.

तरूण भारत

# नॅनो सायन्सच्या विद्यार्थिनींना समर रिसर्च फेलोशिप

प्रतिनिधी

कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी या अधिविभागातील विद्यार्थिनींची इंडियन ॲकॅडमी ऑफ सायन्सेस बेंगलोर यांच्यातर्फे दिल्या जाणाऱ्या प्रतिष्ठित समर रिसर्च फेलोशिपसाठी निवड झाली आहे. या फेलोशीप अंतर्गत निवड झालेल्या विद्यार्थ्यांना भारतातील आघाडीच्या शिक्षण आणि संशोधन संस्थांमध्ये दोन महिने संशोधन करण्यासाठी बोलावले जाते या कालावधीमध्ये विद्यार्थ्यांना फेलोशिप मिळते. आकांक्षा माने, गायत्री पाटील, उजमा फरास यांना ही फेलोशिप मिळाली आहे.

अधिविभागातील बी. एसी-एम. एसी नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी (पाच वर्षांचा एकात्मिक) अभ्यासक्रमाच्या या विद्यार्थिनी आहेत. आकांक्षा माने (चोपडे वाडी, सांगली) हिची भारतातील सर्वोच्च संशोधन संस्था इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, बेंगळुरू येथे निवड झाली आहे. तसेच गायत्री पाटील (भादोले, कोल्हापूर) आणि उजमा फरास (कोल्हापूर शहर) या दोघींची संशोधनामध्ये अग्रगण्य असणाऱ्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, हिमाचल प्रदेश येथे निवड झाली आहे. या विद्यार्थिनींना अधिविभागातील डॉ. सुशिकुमार जाधव, डॉ. योजना पाटील, प्रा. मुकेश पाडवी यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरु डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, अधिविभाचे प्रभारी संचालक प्रा. डॉ. किरणकुमार शर्मा या सर्वांनी विद्यार्थिनींचे अभिनंदन केले. विद्यापीठातील सर्वोत्तम अधिविभाग असा पुरस्कार मिळालेला नॅनो सायन्स आणि तंत्रज्ञान विभाग दिवसेंदिवस राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर देखील उत्तुंग कामगिरी करत आहे. या विभागातील विद्यार्थ्यांनी अनेक वेगवेगळ्या क्षेत्रामध्ये यश मिळवत आहेत.

पुण्यनगरी

# शिवराजच्या तेजस्विनी चौगुलेची निवड



गडहिंग्लज : येथील शिवराज महाविद्यालयाची बी. कॉम २ मध्ये शिकणारी तेजस्विनी चौगुले हिची राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत मुंबई येथे होणाऱ्या राज्यस्तरीय युवा अभिमत संसदसाठी निवड झाली आहे. महाराष्ट्र पातळीवरील या अभिनव उपक्रमासाठी शिवाजी विद्यापीठातून फक्त सहा विद्यार्थी निवडण्यात आले असून, कोल्हापूर जिल्ह्यातून दोनच विद्यार्थ्यांचा यामध्ये समावेश आहे. तिला शिवराज कॉलेजने दत्तक कन्या म्हणून स्वीकारले असल्याची माहिती प्राचार्य डॉ. एस. एम. कदम यांनी दिली.

लोकमत

# शिवस्पंदन क्रीडा महोत्सवास विद्यापीठात प्रारंभ

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : क्रीडापटूंचे उत्कृष्ट संचलन, विविध क्रीडा प्रकारांच्या प्रात्यक्षिकांचे सादरीकरण आणि ज्योत प्रज्वलन या उपक्रमांनी मंगळवारी सकाळी शिवाजी विद्यापीठाच्या पहिल्या 'शिवस्पंदन क्रीडा महोत्सव-२०२३'चे शानदार उद्घाटन झाले.

प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी सकाळी आठ वाजता रोपट्यास पाणी वाहून क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन तसेच ध्वजवंदन केले. विविध ११ अधिविभागांतील क्रीडापटूंनी उत्कृष्ट संचलन केले. यामध्ये अॅग्रोकेमिकल अँड पेस्ट मॅनेजमेंट, जैव-रसायनशास्त्र, वनस्पतीशास्त्र, रसायनशास्त्र, शिक्षणशास्त्र, गणित, इंग्रजी, सूक्ष्मजीवशास्त्र, समाजशास्त्र, तंत्रज्ञान अधिविभाग आणि नॅनो विज्ञान व तंत्रज्ञान या अधिविभागांनी भाग दर्शविला. राष्ट्रीय फुटबॉलपटू प्रतीक्षा संजय मिठारी हिच्या हस्ते उद्घाटनस्थळी क्रीडा ज्योतीचे आगमन झाले.

क्रीडापटूंनी मुष्टीयुद्ध, मल्लखांब, जिम्नॅशियम तसेच रस्सीखेच या क्रीडा प्रकारांची प्रात्यक्षिके सादर केली. क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. अविराज कुळदीप यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. प्रकाश गायकवाड यांनी आभार मानले.

लोकमत

# उन्हाळी परीक्षांसाठी उद्यापासून ऑनलाइन अर्ज

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल २०२३ मधील उन्हाळी सत्रातील परीक्षांसाठी ऑनलाइन अर्ज करण्याची प्रक्रिया उद्या, गुरुवार, दि. २० एप्रिलपासून सुरू होत आहे.

विद्यापीठाच्या परीक्षा आणि मूल्यमापन मंडळातर्फे बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी., एम.ए., एम. कॉम., एम.एस्सी. यासह ८४८ परीक्षा या उन्हाळी सत्रात घेण्यात येणार आहेत. या परीक्षांच्या प्रारंभ तारखा, परीक्षा अर्ज स्वीकारण्याच्या तारखा आणि परीक्षा शुल्काबाबतचे परिपत्रक सर्व संबंधित विद्यार्थी, शिक्षक आणि कर्मचारी यांच्यासाठी जाहीर करण्यात आले आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंग जाधव यांनी दिली आहे.

**एकूण परीक्षा :** ८४८, **२१ एप्रिल :** विनाविलंब अर्ज भरण्याची मुदत, **३ ते ८ मे :** विलंब शुल्कासह अर्ज भरण्याची मुदत, **१० ते १२ मे :** अतिविलंब शुल्काची मुदत

जनसंपर्क कक्ष
19 APR 2023 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# माहितीपट महोत्सवातील सहभाग नोंदणीसाठी मुदतवाढ

**कोल्हापूर, ता. १८ :** राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृती शताब्दी वर्षानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन विभागातर्फे 'राजर्षी छत्रपती शाहू महाराज माहितीपट महोत्सव २०२३'चे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवानिमित्त शाहू महाराजांच्या योगदानावर माहितीपट निर्मिती स्पर्धा होणार आहे. त्यातील सहभागासाठी नोंदणीसाठी ४ मे रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. महोत्सव तांत्रिक कारणांमुळे २७ आणि २८ एप्रिल ऐवजी ११ आणि १२ मे रोजी विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहात होणार आहे. स्पर्धेमध्ये सहभाग घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी नोंदणी अर्ज, माहितीपटाची क्लिप journalism@unishivaji.ac.in या मेलआयडीवर ४ मे रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत पाठवावेत, असे आवाहन प्रा. डॉ. निशा पवार यांनी केले आहे.

तरुण भारत

# अ. भा. आंतरविद्यापीठ नेमबाजीत ज्ञानेश्वरीला कांस्य

कोल्हापूर : अखिल भारतीय आंतरविद्यापीठ



राष्ट्रीय नेमबाजी स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ महिला संघातून प्रतिनिधित्व केलेल्या कोल्हापूरच्या ज्ञानेश्वरी पाटीलने १० मीटर एअर रायफल प्रकारात कांस्यपदक मिळवले. मेरठ (उत्तरप्रदेश) येथील सुभारती विद्यापीठात ही स्पर्धा झाली. यामध्ये देशभरातील ७० विद्यापीठांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेत ज्ञानेश्वरीने ४२०.९ गुणांची कमाई केली. या यशामुळे ज्ञानेश्वरीची लखनऊ (उत्तरप्रदेश) येथे होणाऱ्या युनिव्हर्सिटी खेलो इंडियासाठी निवड झाली. तिला शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. दिगंबर शिर्के, क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाचे संचालक डॉ. शरद बनसोडे, प्रशिक्षक रमेश कुसाळे, तेजस कुसाळे, संतोष जाधव यांचे मार्गदर्शन लाभले.